

दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २५७। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | गुरूवार २२/१०/२०२६ । पाने- ६



एकाचा मृतदेह शोधताना सापडला दुसऱ्याचा सांगाडा

गुजरातच्या तरुणासह पुण्यातील बेपत्ता तरुणाच्या मृत्यूचे गूढ उलगडले

हरिश्चंद्रगडाच्या कोकणकड्यावर थरारक शोधमोहीम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : हरिश्चंद्रगडावरील प्रसिद्ध कोकणकड्याच्या सुमारे ८०० फूट खोल दरीत एका तरुणाचा मृतदेह शोधण्यासाठी उतरलेल्या बचाव पथकाला आणखी एका बेपत्ता तरुणाचा मानवी सांगाडा आढळून आला. या थरारक शोधमोहिमेत गुजरातमधील विश्वराजसिंह मयूरसिंह गोईल याचा मृतदेह बाहेर काढताना पुणे येथील गणेश जितेंद्र सोनार या तरुणाचा सांगाडाही सापडला. या घटनेमुळे हरिश्चंद्रगड परिसरात खळबळ उडाली आहे.

टोकावडे पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली लोणावळा ॲडव्हेंचर ट्रेकर्सचे गणेश गिते आणि त्यांच्या पथकाने कोकणकड्याच्या सुमारे ८०० फूट खोल दरीत उतरून ही शोधमोहीम राबवली. अत्यंत दुर्गम आणि धोकादायक भागात शोध घेत असताना पथकाला विश्वराजसिंह गोईल याचा मृतदेह आढळला. मृतदेह बाहेर काढण्याची कार्यवाही सुरू असतानाच जवळच जुना व जीर्ण झालेला मानवी सांगाडा दिसून आला. त्यामुळे एकाच मोहिमेत दोन वेगवेगळ्या व्यक्तींच्या मृत्यूचे धागेदोरे समोर आले.

पोलिसांनी केलेल्या तपासणीनुसार, आढळलेला मानवी सांगाडा पुण्यातील म्हाळुंगे येथील २६ वर्षीय गणेश जितेंद्र सोनार याचा असल्याचे निष्पन्न झाले. गणेश हा गेल्या जुलै महिन्यापासून बेपत्ता होता. त्याच्या बेपत्ता होण्याची नोंदही करण्यात आली होती. अनेक महिन्यांपासून त्याचा शोध सुरू असताना हरिश्चंद्रगडाच्या खोल दरीत त्याचा सांगाडा आढळल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

पत्नीशी वादानंतर घर सोडले; व्हिडिओ पाठविल्यानंतर शोधमोहीम-दरम्यान, गुजरातमधील २३ वर्षीय विश्वराजसिंह मयूरसिंह गोईल हा पत्नीशी झालेल्या वादानंतर कोणालाही न सांगता घराबाहेर पडला होता. १२ ऑक्टोबर रोजी त्याने हरिश्चंद्रगडावरील कोकणकड्यावरून आत्महत्या करत असल्याचा व्हिडिओ आपल्या कुटुंबीयांना पाठवला होता. त्यानंतर कोकणकड्याच्या परिसरात त्याची बॅग, मोबाइल आणि कपडे आढळून आले होते. या वस्तूंच्या आधारे त्याचा शोध घेण्यासाठी बचाव पथकाने मोहीम हाती घेतली होती.

या मोहिमेदरम्यान विश्वराजसिंहचा मृतदेह सापडला; मात्र त्याचवेळी गणेश सोनार याचा सांगाडाही आढळल्याने शोधमोहिमेला अनपेक्षित वळण मिळाले. एका तरुणाचा शोध घेताना दुसऱ्या बेपत्ता तरुणाच्या मृत्यूचा उलगडा झाल्याने या घटनेची परिसरात चर्चा सुरू झाली आहे.

हरिश्चंद्रगडाचा कोकणकडा हा निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध असला, तरी त्याची प्रचंड खोली आणि दुर्गम भौगोलिक रचना यामुळे अशा ठिकाणी बचावकार्य करणे अत्यंत आव्हानात्मक ठरते. या घटनेने पुन्हा एकदा या परिसरातील धोक्यांकडे लक्ष वेधले आहे.

सौरभ दास, आशुतोष रांका यांच्याकडून याचिका मागे

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

कॉकरोच जनता पार्टीचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका मागे घेतली आहे. या याचिकेद्वारे त्यांनी आपली न्यायालयीन कोठडी वाढवण्याच्या निर्णयाला आव्हान दिले होते. न्यायालयाकडून याचिकाकर्त्यांचे वर्तन आणि त्यांच्या संघटनेची भूमिका यांबाबत प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्यांनी ही याचिका मागे घेतली. उच्च न्यायालयाने नमूद केले की, याचिकाकर्त्यांनी त्यांच्या जामीन अटींचे उल्लंघन केले असून बॅरिकेड्सही तोडले आहेत. हे दोघे अनुक्रमे २७ आणि ३१ वर्षांचे असल्याने, ते 'जनरेशन झेड' मध्ये मोडत नाहीत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. तसेच, न्यायालयाने या संघटनेची उद्दिष्टे आणि त्या संघटनेशी याचिकाकर्त्यांचा संबंध नेमका काय आहे, याबद्दलही विचारणा केली.

सरकारने जंतर-मंतरला निदर्शनांसाठी निश्चित केलेल्या ठिकाणांच्या यादीतून काढून टाकले आहे. असे असूनही, १३ ऑक्टोबर रोजी उगझ चे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका हातात तिरंगा घेऊन जंतर-मंतरवर पोहोचले. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. १४ ऑक्टोबर रोजी दंडाधिकारी न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यांची सुरुवातीची कोठडी १९ ऑक्टोबर रोजी संपली, त्यानंतर ती आणखी दोन दिवसांनी वाढवण्यात आली. या वाढीव कोठडीच्या निर्णयाला या दोन्ही नेत्यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

हायकोर्टाचा प्रश्नः जंतरमंतरवर जाण्यास मनाई होती, तुम्ही का गेलात?

हमीपत्राचे (बॉन्डचे) उल्लंघनः दोन्ही व्यक्तींनी (सौरव आणि आशुतोष) यापूर्वी शांतता राखण्याचे हमीपत्र दिले होते. त्यानंतरही ही घटना घडली. हमीपत्राचे उल्लंघन होण्याची भीती खरी ठरली असेल, तर प्रशासनाने कठोर नियमांनुसार कारवाई केली, यात चुकीचे काय आहे?

बॅरिकेड्स ओलांडण्याबाबतः आंदोलक बॅरिकेड्स ओलांडतात, तेव्हा त्यांच्यासोबत आणखी १०-२० लोक सामील होण्याचा धोका असतो. बाहेरून आलेले हे लोक आंदोलकांच्या नियंत्रणाबाहेरच्या कृती करू शकतात, ज्यामुळे शांतता भंग पावण्याची शक्यता निर्माण होते. शांततापूर्ण आंदोलनाबाबतः शांततापूर्ण आंदोलनकरायचे होते, तर पोलिसांची परवानगी का घेतली नाही? परवानगी घेतली असती, तर आंदोलनाचे वातावरण बिघडवू शकणाऱ्या व्यक्तींना गटात सामील होण्यापासून रोखणे शक्य झाले असते. जर जंतरमंतरवर जाण्यास मनाई होती, तर तुम्ही तिथे गेलातच का? ते 'जनरेशन-झेड' नाहीतः न्यायालयाने दोन्ही याचिकाकर्त्यांच्या वयाबद्दल विचारणा केली. त्यांच्या वकिलांनी सांगितले की, एकाचे वय २७ वर्षे तर दुसऱ्याचे ३१ वर्षे आहे. त्यावर न्यायालयाने टिप्पणी केली.



चारा छावण्यांबाबत लवकर निर्णय व्हावा - मा. मंत्री बाळासाहेब थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शेजारील कर्नाटक राज्यात दुष्काळामुळे चारा छावण्या सुरू करण्यात आल्या आहेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही शासनाने तातडीने निर्णय घेऊन चारा छावण्या सुरू कराव्यात तसेच इतर भागांमधून किंवा इतर राज्यांमधून चारा उपलब्ध करून द्यावा. राज्य सरकारने शेतकऱ्यांसोबतच शेतमजुरांच्या पाठीशी उभे राहावे अशी आग्रही मागणी काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली.

राज्यातील दुष्काळी परिस्थिती बाबत बोलताना राज्यामध्ये दुष्काळाची भीषण परिस्थिती निर्माण होत असून पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. यंदा खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला आहे. सोयाबीन सारखी पिके शेतातून काढण्यासाठी चार ते पाच हजार रुपये खर्च येतो. परंतु शेतकऱ्यांच्या हातात काहीही उरले नाही. पाणी नसल्यामुळे रब्बी हंगाम हाती येण्याची शक्यता उरलेली नाही. येत्या काळात पिण्याच्या पाण्याची अत्यंत भीषण टंचाई जाणवणार आहे. त्याचबरोबर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न बिकट होणार असून विशेषता दुधाळ जनावरांचे संगोपन करणे शेतकऱ्यांसाठी कठीण काम झाले आहे.

पिकेच नसल्यामुळे शेतात काम करणाऱ्या शेतमजुरांच्या हाताला काम



उरलेले नाही. रोज कमावून रोज खाणाऱ्या शेतमजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. शेजारील कर्नाटक राज्यात दुष्काळामुळे चारा छावण्या सुरू करण्यात आल्या आहेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही शासनाने तातडीने निर्णय घेऊन चारा छावण्या सुरू कराव्यात तसेच इतर भागांमधून किंवा इतर राज्यांमधून चारा उपलब्ध करून द्यावा अशी मागणी त्यांनी केली. दुष्काळाच्या सुरुवातीलाच आम्ही सरकारवर थेट आरोप करू इच्छित नाही परंतु सरकारने या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शेतकरी,शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे असे ते म्हणाले.

आगामी दहा महिने अतिशय कठीण जाणार असून राज्यासमोर दुष्काळाचे मोठे संकट आहे. पाणी,चारा, पशुधन आणि शेतकरी शेतमजुरांच्या उपजीविकेचा प्रश्न गंभीर बनणार आहे. शेतकरी सध्या मोठ्या अडचणीत जात असून त्यांना वेळोवेळी पाठबळ देणे गरजेचे आहे. कर्जमाफीचे टप्पे केल्यामुळे व्याजाचा व बँकेचा नवा प्रश्न उभा राहिला असून यावर सरकारने तातडीने मार्ग काढावा अशी मागणी ही त्यांनी केली. साखर कारखानदारीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली असून यावर्षी दुष्काळामुळे ऊसाची उपलब्धता कमी असणे, पावसाअभावी वजनामध्ये झालेली घट आणि कारखान्याची क्षमता वाढल्यामुळे चालू गळीत हंगाम १०० दिवस ही चालेल की नाही अशी भीती आहे. साखर कारखानदारी वाचवण्यासाठी सुद्धा सरकारने व सर्व संबंधित विभागांनी एकत्र येऊन तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट केले.









आवजीनाथ बाबा देवस्थानला 'ब' वर्ग दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार – आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- लोहारे येथील आवजीनाथ बाबा देवस्थान हे जागृत आणि सर्व समाजासाठी श्रद्धा व प्रेरणेचे केंद्र आहे. या देवस्थानाचा सध्या असलेला 'क' वर्ग दर्जा बदलून 'ब' वर्ग दर्जा मिळवून देण्यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करणार असून, त्यासाठी ग्रामस्थ आणि देवस्थान ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले. संगमनेर तालुक्यातील लोहारे येथे आवजीनाथ बाबा यात्रा उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आ. खताळ यांच्या हस्ते देवस्थान परिसरातील विकासकामांचे लोकार्पण करण्यात आले. देवस्थानाच्या विकासासाठी पर्यटनाच्या माध्यमातून यापूर्वी २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले. विकासकामांसाठी निधी देण्याबरोबरच कामाचा दर्जा



आणि गुणवत्ता राखण्यावरही आपला भर राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

'ब' वर्ग दर्जासाठी विशेष प्रयत्न- हिवरगाव पावसा येथील देवगड देवस्थानाला 'ब' वर्ग दर्जा मिळवून देण्यात यश आल्याचे सांगत, यावर्षी किमान तीन, तर पुढील वर्षी पाच देवस्थानांना 'ब' वर्ग दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले. या दर्जामुळे देवस्थानांच्या विकासासाठी शासनाकडून निधी उपलब्ध होण्यास मदत होते. त्यामुळे ग्रामस्थांनी आणि ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी यासाठी पुढाकार घ्यावा, असेही ते म्हणाले. तालुक्यात सरसकट पीक पंचनाम्यांच्या सूचना देण्यात आल्या असून, शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढे यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

मुलींसाठी ५०० सायकली, महिलांसाठी ५०० शिलाई मशीन - संगमनेर मतदारसंघातील विद्यार्थिनींसाठी ५०० सायकली आणि महिलांसाठी ५०० शिलाई मशीन उपलब्ध करून देण्याचा शब्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याची माहिती आमदार खताळ यांनी दिली.

तसेच, ग्रामीण भागातील शेतकरी आणि आदिवासी बांधवांना फायनान्स कंपन्यांकडून कर्जवसुलीसाठी त्रास दिला जात असल्यास तो सहन केला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी चंद्रकांत कर्पे, ॲड. गोरक्ष कापकर, सी.ए. भास्कर मुर्तडक, घनश्याम भास्कर, ड. शरद काकड, नवनाथ जोंधळे, गणेश वराडे, राहुल आहेर, सुदर्शन पोकळे, राहुल महाराज पोकळे, शरद येलमामे, शरद मुर्तडक, नवनाथ कानकाटे, शंकर रानमाळे यांच्यासह मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी, शिवसेना-महायुतीचे कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जरांगे विरुद्ध रामदास कदम राजकीय वाद पेटला!

जालना (वृत्तसंस्था)

दसरा मेळाव्यात एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आमच्यावर ओरडणारे आणि बाप दाखवायची भाषा करणारे नेते आता कितीही थयथयाट करत असले, तरी उद्या सकाळी ११ वाजता पत्रकार परिषद घेऊन भाजपमधील ती सर्व कुजबुज पुराव्यासह महाराष्ट्रासमोर मांडणार आहे. या ५०० कोटींच्या संपूर्ण कटात दोन माजी मुख्यमंत्र्यांची नावे असून, त्यात अत्यंत शुद्ध मराठी आणि हिंदी बोलणाऱ्या बड्या नेत्यांचा समावेश आहे. उद्या ११ नंतर खरी औकात कोणाची आहे आणि खरा बेइमान कोण, हे महाराष्ट्रातील जनतेला स्पष्ट दिसेल, असा जोरदार पलटवार मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केला.

बीडच्या नारायणगडावरील दसरा मेळाव्यात मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर भाजप नेत्यांकडून ५०० कोटी रुपये घेऊन ते श्रीकांत शिंदे यांच्यामार्फत जरांगेंना दिल्याचा संशय उपस्थित केला होता. यावर रात्री मुंबईतील नेस्को सेंटरमधील दसरा मेळाव्यातून शिवसेना नेते रामदास कदम यांनी जरांगे यांच्यावर बाथरूममध्ये जाऊन गुपचूप खातात, त्यांची संपत्ती तपासा आणि बाप दाखवा नाहीतर श्राद्ध घाला असा घणाघाती हल्ला चढवला होता. या टीकेला एका वृत्तवाहिनीशी सविस्तर संवाद साधताना मनोज जरांगे पाटील यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत उत्तर दिले.



रामदास कदम यांच्या विधानाचा समाचार घेताना जरांगे पाटील म्हणाले, आम्ही लहान असताना रामदास भाई भगव्यासाठी कसे लढायचे हे ऐकत आलो आहोत. त्यामुळे त्यांच्यावर वैयक्तिक चिखलफेक करण्याची माझी इच्छा नाही. मात्र, पक्षाच्या नेत्याची री ओढण्यासाठी ते ज्या पद्धतीने अस्वस्थ आणि बेचैन होऊन बोलले, त्याचे उत्तर देणे भाग आहे.

शिंदे साहेबांनी स्वतः भाजपच्या केंद्रीय आणि राज्यातील नेत्यांना सांगितले नसते, तर भाजपच्या अंतर्गत वर्तुळात ही चर्चा कशी रंगली असती? मी साधा प्रश्न विचारला होता की, 'तुम्ही भाजपला असे सांगितले आहे का, आणि ते पैसे मला दिले आहेत का? दिले असतील तर हो म्हणा, नसतील तर नाही म्हणा.' यावर एवढा त्रागा करण्याचे कारण काय होते? 'पुरावे द्या' असे म्हणत त्यांनीच स्पष्ट केले की पैसे दिले नाहीत.



ग्रामपंचायत रुंभोडी. ता. आकोले. जि. अहिल्यानगर

२०२६-२०२७ ब१ निविदा नोटीस

ग्रामपंचायत रुंभोडी. ता. आकोले. जि. अहिल्यानगर यांचेकडून खालील कामाचेनोंदणीकृत कंत्राटदारांकडून सीलबंद ब१ लिफाफा दोन पद्धतीने निविदा मागण्यात येत आहे.

अ.न	कामाचे नाव	योजना	निविदा विक्री	बयाना रक्कम	निविदा रक्कम	कामाची मुदत	वर्गवारी
१	मौजे रुंभोडी येथे वीज पुरवठा करणे	१५ वा वित्त आयोग ग्रा.पं.स्तर सन २०२५-२०२६	२५४/-	१%	१,५०,०००/-	६महिने	मजुर संस्था
२	मौजे रुंभोडी येथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सार्वजनिक सौचालाय बांधकाम करणे.	१५ वा वित्त आयोग ग्रा.पं.स्तर सन २०२५-२०२६	२५४/-	१%	३,००,०००/-	६महिने	सु.बे.

निविदा अटी व शर्ती

१) निविदा व कामाच्या शर्ती - अटी बाबतची माहिती ग्रामपंचायत रुंभोडी कार्यालयात दि. २२/१०/२०२६ ते दि. २९/१०/२०२६ या कालावधित कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस सोडून) मिळतील

२) सीलबंद निविदा दि. २९/१०/२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील

३) निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायत रुंभोडी यांनी राखून ठेवला आहे.

४) निविदा उघण्याची प्रक्रिया दि. ३०/१०/२०२६ रोजी सकाळी ठीक १०:३० वाजता ग्रामपंचायत रुंभोडी कार्यालयात निविदा धारक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष पार पडेल.

५) निविदा फार्म सोबत अ) नोंदणी प्रमाणपत्र ब) जीएसटी नंबर क) पॅनकार्ड ड) आयकर विवरण इ) व १ निविदा फॉर्म ई) आधारकार्ड ए) बंधपत्र १०० स्टॅम्प पेपर वर

६) कामाचे अनुभव दाखले (सु.बे.साठी सुरुवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सुट राहील. नवीन नोंदणी असेल बाबतचे १०० च्या स्टम्प पेपर वर जोडणे आवश्यक राहील)

७) बयाना रक्कम व निविदा फी भरलेली (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत

. ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत रुंभोडी
ता. अकोले जि.अहिल्यानगर

प्रशासक
ग्रामपंचायत रुंभोडी
ता.अकोले जि.अहिल्यानगर

दुष्काळावर बोला, आरोप-प्रत्यारोप नकोत – रोहित पवार

मुंबई (वृत्तसंस्था)

देशात आणि राज्यात जर अघोषित आणीबाणी आली असेल, पोलिस प्रशासन जर नीट काम करत नसेल. कायदा आणि सुव्यवस्थेची जर वाट लागली असेल. सर्वांवर अन्याय होत असेल तर बदलून टाका हे सरकार काय हरकत आहे, सरकार काय बोलते यापेक्षा लोकं काय म्हणतात याला जास्त महत्त्व आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

रोहित पवार म्हणाले की, महाराष्ट्रात कलाकार, राजकीय नेते आणि सामान्य व्यक्तीवर गोळ्या झाडल्या जातात, हे बघितल्यावर तर असेच म्हणावे लागेल की या ज्या गुंडांच्या गँग आहेत त्यांना केंद्रीय गृहमंत्र्यांचा आणि राज्यातील गृहमंत्र्यांचा पाठिंबा आहे. जर पाठिंबा असेल तर तेच सत्ताधारी आहेत असे म्हणावे लागेल.



रोहित पवार म्हणाले की, मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा उमेदवार आज किंवा उद्या आपली भूमिका बदलेल असे मला वाटते. कारण सुप्रिया युळे उद्धव ठाकरे यांच्याशी बोलत आहेत. पण मविआचे जे कार्यकर्ते आहेत, ते प्रताप पाटील यांच्या पाठिशी आहेत. त्यांना ८० टक्के मतदान होईल. सतीश चव्हाण यांनी २०२४ मध्येच हार मानली होती म्हणून त्यांनी गंगापूर विधानसभेची निवडणूक लढवली होती. त्यांच्या मागे जनता उभी राहील असे वाटत नाही.रोहित पवार म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांना मेळावा समर्पित केल्याने शेतकऱ्यांचा काय फायदा नाही. त्यांनी शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची मदत करावी. तर शेतमजूरांना २५ हजार रुपये प्रत्येक कुटुंब द्यावी. माता-भगिणींनी जे बचत गटाचे कर्ज घेतले, मुलांनी जे शैक्षणिक कर्ज घेतले ते माफ करा. ज्या विद्यार्थ्यांना फीस भरता येणार नाही त्याबद्दल निर्णय घ्या. एखादा कार्यक्रम किंवा सभा शेतकऱ्यांना समर्पित करण्यापेक्षा त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करा, तुमच्याकडे सरकार आहे.रोहित पवार म्हणाले की, दुष्काळामुळे ४० टक्के लोकं ग्रामीण भागाकडून शहरीभागाकडे जातील. जनावरांची किंमत पडायला लागली आहे. सरकारने शेतकऱ्यांना १ लाख रुपये हेक्टरी मदत जाहीर केली पाहिजे. पिण्यासाठी पाणी वाढवले गेले पाहिजे आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न सुद्धा सोडवला गेला पाहिजे. ज्यावेळी शेतकरी अडचणीत येतो त्यावेळी त्यांच्या मुलांचे शिक्षण थांबवण्याशिवाय दुसरा काही पर्याय नसतो. त्यामुळे ते प्रवाहातून बाहेर पडू शकतात. सरकारने विद्यार्थ्यांच्या परीक्षा फीससह, सर्वच फीस माफ केली पाहिजे.

रोहित पवार म्हणाले की, आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा आज दुष्काळावर चर्चा होणं जास्त गरजेची आहे. मजुरांची, शेतकऱ्यांची जी अडचण आहे त्यावर बोलले गेले पाहिजे. आम्ही त्यावर लक्ष केंद्रित करत बोलत असतो. कोणी कोणावर काय टीका केली हे महत्त्वाचे नाही.रोहित पवार म्हणाले की, आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा आज दुष्काळावर चर्चा होणं जास्त गरजेची आहे.

कंत्राटदारांची ८६ हजार कोटींची देयके प्रलंबित

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर : राज्यातील विविध शासकीय विभागांकडील कंत्राटदारांची प्रलंबित देयके तातडीने अदा करावीत, कंत्राटदारांच्या आर्थिक व प्रशासकीय समस्या सोडवाव्यात आणि या प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासनाने उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, या प्रमुख मागण्यांसाठी अहिल्यानगर येथे निवासी ने उपजिल्हाधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभियंता यांना निवेदन देण्यात आले.



मिलिंद भोसले यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया, राज्य् अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना आणि ऑल इंडिया कॉन्ट्रॅक्टर्स वेल्फेअर असोसिएशन या संघटनांच्या वतीने हे निवेदन सादर करण्यात आले. राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जलजीवन मिशन, जलसंपदा, ग्रामविकास, आदिवासी विकास व इतर शासकीय विभागांकडील कंत्राटदारांची अंदाजे ८६ हजार कोटी रुपयांची देयके गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित अहित. त्यामुळे कंत्राटदारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून बँकांची कर्जफेड, व्याज, मजुरांची देणी, साहित्य पुरवठादारांची बिले आणि इतर

व्यावसायिक जबाबदाऱ्या पार पाडताना मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत

मागील अकरा महिन्यांत उद्योजक कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याचा गंभीर मुद्दा निवेदनातून उपस्थित करण्यात आला. कंत्राटदारांवरील वाढता आर्थिक ताण आणि प्रलंबित देयकांचा प्रश्न लक्षात घेऊन शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, आत्महत्याग्रस्त कंत्राटदारांच्या कुटुंबीयांना, आर्थिक मदत द्यावी आणि भविष्यात अशा दुर्दैवी घटना रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी समीर शेख, संजय गुंबजा, अक्षय कराड, गणेश श्रीराम, दीपक दरे, अनिल कोठारी, उदय मुंडे, आर. एन. रेपाळे, किशोर कुलकर्णी, अविनाश ओहळे, श्रीकांत लांडे पाटील, विनंत्य खेडकर, श्रीनाथ झिने, श्रीकांत दशडे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, कंत्राटदार उपस्थित होते.

कामे पूर्ण करूनही वेळेवर देयके मिळत नसतील, तर कर्जाचे हसे व्याज, मजुरांची देणी आणि साहित्य पुरवठादारांची बिले कशी भरायची, हा गंभीर प्रश्न निर्माण होतो. शासनाने आता तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन कंत्राटदारांना न्याय द्यावा अशी मागणी समीर शेख, विभागीय अध्यक्ष, राज्य अभियंता संघटना, उत्तर महाराष्ट्र यांनी केली आहे.

जाहीर निविदा

दहिफळ जुने सन २०२६-२७ ग्रामपंचायत अंतर्गत खुली निविदा सुचना १

सरपंच ग्रामपंचायत दहिफळ जुने, ता. शेवगाव जि. अ. नगर योग्य नोंदणीकृत कंत्राटदाराकडून लिफाफा पद्धतीने खालील कामांच्या निविदा मागविन्यात येत आहे. निविदा कोरा नमूना संच वाटप व भरलेली निविदा स्विकारण्याचा कालावधी दि. २२/१०/२०२६ रोजी सकाळी ११ वा. ते दि. २९/१०/२०२६ रोजी सायंकाळी ५ वा. पर्यंत

अ. क्रं.	कामाचे नाव	अंदाजपत्रकिय रक्कम रु.	बयाना रक्कम	काम पुर्ण करण्याची मुदत	कोऱ्या निविदा संचाची किंमत	ठेकेदाराचा वर्ग	योजनेचे नाव
१.	मौजे दहिफळ जुने येथील बंदिस्त गटार करणे	३८५०००/-	३८५०/-	६ महिने	५९०/-	सु.बे.	१५ वा वित्त आयोग सन २०२५-२०२६
२.	मौजे दहिफळ जुने येथील स्मशानभुमीत बोअरवेल घेणे व सोलर बसवणे	४८५२०४/-	४८५२/-	६ महिने	५९०/-	सु.बे.	१५ वा वित्त आयोग सन २०२४-२०२५
३.	मौजे दहिफळ जुने येथील ग्रामपंचायत ऑफिसमध्ये छत वॉटरप्रूफ करणे	१२०००० /-	१२००/-	६ महिने	२३६/-	सु.बे.	१५ वा वित्त आयोग सन २०२५-२०२६
४.	मौजे दहिफळ जुने येथे अण्णाभाऊ साठे बंदिस्त गटार करणे	९७०३९/-	९७०/-	६ महिने	२३६/-	मजूर सह संस्था	१५ वा वित्त आयोग सन २०२५-२०२६
५.	मौजे दहिफळ जुने येथील प्राथमिक शाळेचे सांस्कृतिक स्टेज करणे	१६१७००/-	१६१७/-	६ महिने	२३६/-	मजूर सह संस्था	१५ वा वित्त आयोग सन २०२५-२०२६

१. उपरोक्त विषयान्वये निविदा अटी व शर्त इ. बाबत सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असुन कोऱ्या निविदा संच दि. २२/१०/२०२६ रोजी सकाळी ११ वा. ते दि. २९/१०/२०२६ रोजी सायंकाळी ५ वा. पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय दहिफळ जुने येथे पहावयास मिळेल. २. बयाना रक्कम ही धनाकर्ष सरपंच ग्रामपंचायत दहिफळ जुने यांच्या नावाने असणे अभिप्रेत आहे. ३. उपरोक्त कामाची दि. २२/१०/२०२६ रोजी सकाळी ११ वा. ते दि २९/१०/२०२६ रोजी सायंकाळी ५ वा. पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत स्वीकारली जाईल ४. निविदा दि. ३०/१०/२०२६ रोजी सकाळी ११ वा. ग्रामपंचायत कार्यालय दहिफळ जुने येथे उघडण्यात येतील. ५. निविदा या बयाना लिफाफा, तांत्रिक लिफाफा या पद्धतीच्या सादर करावयाच्या आहेत. ६. निविदा अटी व शर्तिमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारन्याचा अधिकार निम्न स्वाक्षरी राखून ठेवलेला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत दहिफळ जुने, ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

SMBT | DENTAL COLLEGE & HOSPITAL

Ghulewadi (Amrutnagar), Tal. Sangamner, Dist. Ahmednagar- 422608 (02425) 225434 Fax No. (02425) 222867
mfo.dental@smbt.edu.in | smbtdental@rediffmail.com www.dcs.smbt.edu.in

(Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik)

VACANCIES

Applications are invited on plain paper along with all necessary copy of certificate, from the eligiable candidate for the following post. Qualifcation & Experiences as per DCI / NDC & MUHS Norms.

Sr.No.	Type of Post	Vacant Posts			
1	DEAN / PRINCIPAL*	-			
Sr.No.	[DENTAL STAFF]	Vacant Posts			
	Dept. / Subject	Professor	Reader	Lecturer @	Tutor @
1	PROSTHODONTICS AND CROWN & BRIDGE	-	1(Open)	02(OBC), 02 (Open)	01(SC), 01(VJ-A), 02(EWS) 03(Open)
2	ORAL PATHOLOGY & ORAL MICROBIOLOGY	1(Open)	1(Open)	01 (NT-B), 02 (OBC)	
3	CONSERVATIVE DENTISTRY & ENDODONTICS	-	-	1(SC), 1(EWS)	
4	ORAL & MAXILLOFACIAL SURGERY	-	-	-	
5	PERIODONTOLOGY	-	-	01 (SC), 01 (OBC), 1(Open)	
6	ORTHODONTICS	-	01 (EWS)	01(OBC),	
7	PAEDIATRIC & PREVENTIVE DENTISTRY	-	-	-	
8	ORAL MEDICINE & RADIOLOGY	-	01 (OBC)	01(Open),	
9	PUBLIC HEALTH DENTISTRY	-	-	01(Open),	
	[MEDICAL STAFF]	Reader		Lecturer	
10	ANATOMY	-		01(OBC), 01(Open)	
11	PHYSIOLOGY	01 (Open)		01(SC)	
12	BIOCHEMISTRY	01 (Open)		-	
13	PHARMACOLOGY	01 (Open)		01(NT-C), 01(OBC) , 1(Open)	
14	GENERAL PATHOLOGY	01 (Open)		01(OBC), 1(Open)	
15	MICROBIOLOGY	-		01 (Open),	
16	GENERAL MEDICINE	01 (Open)		01(SC), 01(ST)	
17	GENERAL SURGERY	01 (Open)		01(SC), 01 (NT-C)	
18	ANAESTHESIOLOGY	01(Open)		01(Open)	

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट माळवाडी (बोटा) येथे अधिष्ठाता डॉ. धनंजय मंडलिक यांची भेट



युवावार्ता (प्रतिनिधी)

बोटा - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. धनंजय मंडलिक यांनी श्री बाळेश्वर शैक्षणिक व कृषी विकास फाउंडेशन संचलित श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी, माळवाडी-बोटा या महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली. त्यांच्या या भेटीमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व प्रशासकीय कार्याला प्रोत्साहन मिळाले.

या सदिच्छा भेटीदरम्यान महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रम, व्यवस्थापन शिक्षणाची गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, संशोधनविषयक कार्य तसेच उच्च शिक्षणातील बदलत्या संधी यासंदर्भात चर्चा करण्यात आली. विद्यापीठ आणि महाविद्यालय यांच्यातील समन्वय अधिक दृढ होण्यासाठी अशा भेटी महत्त्वपूर्ण ठरतात. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे आणि त्यांच्यामध्ये व्यावसायिक कौशल्ये, नेतृत्वगुण व संशोधनवृत्ती विकसित व्हावी, यासाठी शैक्षणिक संस्थांनी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे, या दृष्टीने या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

सध्याच्या स्पर्धात्मक युगात व्यवस्थापन शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना उद्योगजगताच्या गरजांनुसार ज्ञान व कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण, व्यावहारिक ज्ञान, उद्योगांशी समन्वय आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे ही महाविद्यालयां समोरील महत्त्वाची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर अधिष्ठाता डॉ. धनंजय मंडलिक यांच्या सदिच्छा भेटीमुळे महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना शैक्षणिक कार्यासाठी नवी प्रेरणा मिळाली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पोखरकर आणि संस्थेचे सचिव डॉ. अमित पोखरकर यांनी डॉ. धनंजय मंडलिक सर यांचे स्वागत केले. याप्रसंगी संस्थेचे कार्यालयीन अधीक्षक श्री. बाळासाहेब शेळके, व्यवस्थापन विभागाचे विभागप्रमुख प्रा. राहुल घोसाळे, प्रा. हरिदास लगड, प्रा. गणेश बदाडे, प्रा. योगेश राऊत तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक उपस्थित होते. या भेटीदरम्यान उपस्थित मान्यवरांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीबाबत संवाद साधला. विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करणे, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे आणि महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी सकारात्मक वातावरण निर्माण करणे यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचा दृष्टिकोन व्यक्त केला. संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत विद्यापीठातील मान्यवरांच्या मार्गदर्शनाला महत्त्वाचे स्थान असून, डॉ. धनंजय मंडलिक सर यांच्या भेटीमुळे महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढला. त्यांच्या बहुमूल्य वेळेबद्दल आणि सदिच्छा भेटीबद्दल संस्थेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

WPL लिलावाची उत्सुकता शिगेला!

मुंबई (वृत्तसंस्था)

वुमन्स प्रीमियर लीग २०२७ स्पर्धा जानेवारीत होणार आहे. या स्पर्धेचं हे पाचवं पर्व असून पाचही संघ या स्पर्धेसाठी मोर्चेबांधणी करत आहेत. आतापर्यंत झालेल्या चार पर्वात मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या संघांनी प्रत्येकी दोन वेळा जेतेपद मिळवलं आहे. तर इतर तीन फ्रेंचायझींच्या पदरी निराशा पडली आहे. असं असलं तरी पाचही फ्रेंचायझी येत्या पर्वात जेतेपदासाठी आपली ताकद लावणार आहे. तत्पूर्वी या स्पर्धेसाठी खेळाडूंचा लिलाव पार पडणार आहे. ही लिलाव प्रक्रिया २८ ऑक्टोबरला होणार आहे. या लिलावात भारतीय फलंदाज जी कमलिनी, अष्टपैलू स्नेह राणा, ऑस्ट्रेलियाची कर्णधार सफी मोलिन्यू आणि श्रीलंकेची कर्णधार चमारी अटापट्टू यांच्यासह १४६ खेळाडूंवर बोली लागणार आहे. पण पाचही फ्रेंचायझींच्या मिळून २७ जागा शिल्लक आहेत. म्हणजेच १४६ पैकी फक्त २७ जणींचं नशिब चमकणार आहे. वुमन्स लीग स्पर्धेसाठी पार पडणाऱ्या लिलाव प्रक्रियेतील १४६ पैकी ११९ खेळाडू हे भारतीय आहेत. .

रंग सेवेचा आणि कर्तुत्वाचा

शैक्षणिक क्षेत्रातील कर्तृत्वाचा गौरव विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचे योगदान...

ज्ञानदान, संस्कार आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित एक यशस्वी शैक्षणिक प्रवास... सर्वसामान्य परिस्थितीतून उच्च शिक्षणाचे शिखर गाठत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या डॉ. सौ. अस्मिता देशपांडे यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्यातून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सामाजिक जाणीव रुजविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडविणारे प्रभावी माध्यम आहे, या विचारातून त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्याला दिशा दिली. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्यामध्ये जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची वृत्ती विकसित करणे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

शैक्षणिक क्षेत्रातील आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या बळावर त्यांनी अध्यापनासोबतच विविध शैक्षणिक व उपक्रमशील कार्यात सक्रिय सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी, त्यांच्यातील सर्जनशीलता विकसित करण्यासाठी तसेच गोखले एज्युकेशन सोसायटीच्या व शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न निश्चितच प्रेरणादायी आहेत.

शिक्षकाचे खरे यश हे विद्यार्थ्यांच्या यशात आणि त्यांच्या जीवनातील सकारात्मक परिवर्तनात असते, ही भूमिका त्यांनी आपल्या कार्यातून अधोरेखित केली आहे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि आत्मविश्वास देत त्यांच्या उज्ज्वल भवितव्याची पायाभरणी करण्याचे कार्य त्यांनी निष्ठेने केले.

शिक्षण क्षेत्रात बदलत्या काळानुसार नवनवीन संकल्पना सहजगत्या विद्यार्थ्यांमध्ये रुजवल्या... शिक्षण क्षेत्रातील आधुनिक दुर्गा आधुनिक सरस्वतीच्या कर्तुत्वाच्या सुगंधाचा हा दरवळ समाजात सर्वदूर पसरला आहे आजही त्यांच्यातील संवेदनशील व निस्वार्थी शिक्षिका जिवंत असल्याचे जाणवते त्यांच्या कार्याला त्रिवार वंदन व भावी प्रगतीसाठी खूप खूप शुभेच्छा..



प्रा.डॉ. सौ. अस्मिता देशपांडे, संगमनेर

साईबाबा विद्यालयात कुमारिका पूजन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील समनापुर येथील साईबाबा विद्यालयात १७ ऑक्टोंबर रोजी नवरात्री निमित्ताने कुमारिका पूजन हा कार्यक्रम संपन्न झाला. आजच्या कुमारिका व त्याचे भविष्य आहे म्हणून विविध देवींच्या रूपातील वेशभूषा परिधान करून अनेक कुमारी का या कार्यक्रमाचे निमित्ताने उपस्थित होते.

यावेळी मालपाणी विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक कानडे सर पंकज लॉन्स व ज्वेलर्सचे सर्वेसर्वा सागर शेठ नागरे व सुप्रसिद्ध उद्योजक शेख साहेब माऊली ग्रामविकास प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष श्री भाऊसाहेब भिमाजी शेरमाळे माऊली ग्रामीण विकास प्रतिष्ठान संस्थेचे सेक्रेटरी तथा साईबाबा विद्यालयाचे संस्थापक मुख्याध्यापक शिवाजीराव खुळे सर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ खुळे मॅडम, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री वाकचौरे सर श्रीम.भुजबळ मॅडम चव्हाण मॅडम यांसह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

सरस्वती मातेची पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रस्ताविक मुख्याध्यापिका खुळे मॅडम यांनी केली. यानिमित्ताने . स्त्री शक्तीचे महत्त्व व महिला सबलीकरण या विषयावरती प्राध्यापक श्री कानडे सर यांना व्याख्यान दिले. तदनंतर कुमारिका पूजन विद्यार्थ्यांचे पालक व शिक्षिका यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. विद्यार्थिनींनी धारण केलेल्या वेशभूषेचे व स्त्री शक्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे. शेवटी श्री पंकज ज्वेलर्सचे संचालक श्री सागर शेठ नागरे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या शिक्षिका गेठे मॅडम, हासे मॅडम ,गुंजाळ मॅडम, श्री कोल्हे सर, श्री पर्बत सर शिक्षकेतर कर्मचारी नानासाहेब शेरमाळे ,श्री सागर रणखांबे आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश खरात यांनी केले.

श्री श्री रविशंकर विद्या मंदिरात नवरात्रौत्सव उत्साहात साजरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

सुमेरू एज्युकेशन सोसायटी संचलित श्री श्री रविशंकर विद्या मंदिर, संगमनेर येथे नवरात्रोत्सवानिमित्त भव्य दांडिया स्पर्धेचे आयोजन भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती आणि परंपरांची ओळख व्हावी, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि सांस्कृतिक मूल्यांची रुजवण व्हावी, या उद्देशाने शाळेच्या मैदानावर या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्या आरती सप्रा, परीक्षक वृषाली कासट व तृप्ती कासट आणि समन्वयक यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर आदिशक्ती देवीची भावपूर्ण आरती करण्यात आली. आरतीच्या मंगलमय वातावरणामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

आकर्षक रोषणाई आणि रंगीबेरंगी सजावटीने शाळेचे मैदान सजविण्यात आले होते. इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत दांडियाचा मनमुराद आनंद लुटला.



चार गटांत पार पडलेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पारंपरिक संगीताच्या तालावर सुंदर, उत्स्फूर्त आणि शिस्तबद्ध दांडिया नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांच्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली.

विद्यार्थ्यांच्या सादरीकरणानंतर पालकांसाठीही विशेष दांडिया आयोजित करण्यात आला होता. पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संगीताच्या तालावर फेर धरला. विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्या एकत्रित सहभागामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि कौटुंबिक जिव्हाळ्याचे वातावरण निर्माण झाले.

स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वेशभूषा (बेस्ट कॉस्ट्यूम), उत्कृष्ट सादरीकरण (बेस्ट परफॉर्मन्स), बेस्ट किंग आणि बेस्ट क्वीन अशा विविध श्रेणींमध्ये प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी वेदांती फटांगरे व शारदा कळसकर यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन शिक्षक सतीश नवले यांनी उत्कृष्टरीत्या केले. त्यांच्या सूक्ष्म नियोजनामुळे आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे हा सोहळा शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या उपक्रमाला संस्थेच्या अध्यक्षा स्वाती शाह आणि सेक्रेटरी समीर शाह यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्या आरती सप्रा यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच भारतीय संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी श्री श्री रविशंकर विद्या मंदिरात विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. या दांडिया महोत्सवातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले, तसेच विद्यार्थी आणि पालक यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ झाले. उपस्थित पालकांनी शाळेच्या उत्कृष्ट नियोजनाचे आणि सांस्कृतिक उपक्रमाचे कौतुक केले. अशा प्रकारे आनंद, उत्साह आणि सांस्कृतिक अभिमानाच्या वातावरणात दांडिया महोत्सवाची सांगता झाली.

देवकौवठे येथे 'सर्वस्व' मराठी चित्रपटाचे पोस्टर लॉन्चिंग



युवावार्ता (प्रतिनिधी) -

संगमनेर - संगमनेर आणि सिन्नर तालुक्यातील भाविकांचे मोठे श्रद्धास्थान असलेल्या देवकवठे येथील जगदंबा मातेच्या नवरात्र उत्सवानिमित्त बीआरजी फिल्मचा ॲड. बी. आर. गांडोळे दिग्दर्शित आणि ज्ञानेश्वर माऊली मुंगसे निर्मित असलेल्या सर्वस्व या चित्रपटाचे पोस्टर लॉन्चिंग करण्यात आले. यावेळी मराठी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले, दिग्दर्शक ॲड. बी. आर. गांडोळे, देव माणूस फेम पुष्पा चौधरी यांच्यासह विविध मराठी चित्रपट अभिनेते उपस्थित होते.

जगदंबा माता मंदिर देव कवठे येथे नवरात्र निमित्त आयोजित सर्वस्व या चित्रपटाच्या पोस्टरचे लॉन्चिंग झाले. यावेळी ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले, अभिनेत्री पुष्पा चौधरी, राजहंस दूध संघाचे संचालक भारतशेठ मुंगसे, दिग्दर्शक ॲड. बी. आर गांडोळे, नाशिक महानगरपालिकेचे नगरसेवक भागवतराव आरोटे, उद्योजक एकनाथ मुंगसे, डॉ. शिरीष शेपाळ, इंजिनीयर सुभाष सांगळे, निर्माते ज्ञानेश्वर माऊली मुंगसे, चित्रपट अभिनेत्री दिपाली चौगुले, अभिनेता पांडुरंग वाघमारे, राजू कहांडळ राजू मुंगसे पोलीस पाटील शत्रुघ्न मुंगसे, उद्योजक शिवराज मुंगसे, नामदेव कहांडळ, सुरेश मुंगसे, प्रताप मुंगसे,विलास मामा मुंगसे, संतोष दगडू कहांडळ यांच्यासह गावातील विविध पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

देवकवठे गावाला नाट्य कलेची मोठी परंपरा असून ज्ञानेश्वर मुंगसे व हे नाट्य कलावंत आहे. त्यांनी विविध मालिकांमधून भूमिका केले असून ते सर्वस्व हा मराठी चित्रपट निर्मित करत आहेत याचबरोबर पुणे येथील डॉ. गिरीश शेपाळ हेही निर्माते आहेत. ॲड. बी. आर. गांडोळे हे दिग्दर्शन करत आहेत. हजारो नागरिक व महिलांच्या उपस्थितीमध्ये या चित्रपटाचे भव्य पोस्टर लॉन्चिंग करण्यात आले. यावेळी बोलताना सुनील गोडबोले म्हणाले की ग्रामीण भागामधून मराठी चित्रपट प्रदर्शित होतो आहे या अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

तर भागवतराव आरोटे म्हणाले की ग्रामीण भागातील हा चित्रपट असून या चित्रपटाला प्रेक्षकांची मोठी पसंती मिळणार आहे जगदंबा माता परिसर देवीचे महात्म्य आणि दुष्काळी भाग असा हा चित्रपटाचा विषय असून याबद्दल अनेक नवीन कलाकारांना संधी मिळणार आहे. तर ज्ञानेश्वर मुंगसे म्हणाले की जगदंबा मातेच्या देवीचे महात्म्य महाराष्ट्रामध्ये पोहोचवण्यासाठी हा चित्रपट अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे यामध्ये सर्व गावकरी तरुण मंडळ यांचे मोलाचे सहकार्य असून सर्व टीम चांगली काम करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर दिग्दर्शक बी. आर. गांडोळे म्हणाले की ग्रामीण भागामधून आणि संगमनेर तालुक्यातून हा चित्रपट निर्माण होत असून याच परिसरामध्ये याची सर्व चित्रीकरण होणार आहे. तालुक्यातील निवेदित कलाकारांना जास्तीत जास्त संधी देण्याचा आपला प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

देवकौठे येथील माजी सैनिक अण्णासाहेब मुंगसे यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- देवकवठे येथील रहिवासी व भारतीय सैन्यांमध्ये २२ वर्ष सेवा देणारे माजी सैनिक अण्णासाहेब गणपत मुंगसे यांचे आजाराने वयाच्या ५७ व्या दुःखद निधन निधन झाले आहे. अण्णासाहेब मुंगसे यांनी भारतीय सैन्यामध्ये २२ वर्ष सीमेवर सेवा दिली. काश्मीर, अरुणाचल प्रदेश, हिमालय पंजाब अशा राज्यांबरोबरच श्रीलंकेमध्येही ते सैन्याबरोबर गेले होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी शिर्डी येथे साई संस्थान मध्ये ही काही काळ आपली सेवा दिली.

यानंतर गावात स्वतःचा पोल्ट्री व्यवसाय सुरू करून गावच्या सामाजिक कार्यामध्ये सातत्याने सहभाग घेतला. गावच्या सेवा सोसायटीचे ते सक्रिय संचालक होते. अत्यंत



धार्मिक व मनमिळाऊ स्वभावाचे असलेले अण्णासाहेब मुंगसे हे मेजर नावाने परिसरामध्ये परिचित होते. मागील दोन महिन्यांपासून ते आजारी होते त्यांच्यावर सातत्याने उपचार सुरू होते मात्र अखेर काल त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने देवकवठे सह पंचक्रोशी मध्ये मोठी हळहळ निर्माण झाली. विजयादशमीच्या मुहूर्तावर गावामध्ये सप्ताहाची सांगता असताना अत्यंत शांततेमध्ये शांतता करण्यात आली याचबरोबर गावांमध्ये कुठेही सन साजरा करण्यात आला नाही. सर्व गावकऱ्यांनी शोकसभा आयोजित करून त्यांना आदरांजली अर्पण केली. यानंतर गावच्या वतीने त्यांना मानवंदना देण्यात आली. त्यांच्या पश्चात आई, वीरपत्नी सविता, मुलगा तुषार, व दोन मुली, भाऊ अर्जुन मुंगसे, सुरज मुंगसे असा परिवार आहे.

मेजर अण्णा मुंगसे यांच्या दुःखद निधनाबद्दल काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, भारत शेठ मुंगसे, भागवतराव आरोटे, एकनाथ शेठ मुंगसे यांच्यासह गावातील सर्व ग्रामस्थ, पदाधिकारी मान्यवर यांनी शोक व्यक्त केला आहे.

संपादकीय...

करिअर निवडताना मुलांचे स्वप्न की पालकांची अपेक्षा?

आजच्या स्पर्धात्मक युगात प्रत्येक पालकाला आपल्या मुलाने आयुष्यात यशस्वी व्हावे, आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे आणि समाजात प्रतिष्ठा मिळवावी, असे वाटते. त्यासाठी पालक आपल्या परीने कष्ट घेतात, त्याग करतात आणि मुलांच्या शिक्षणासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करतात. मात्र, मुलांच्या करिअरचा निर्णय घेण्याची वेळ येते, तेव्हा एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो-करिअर निवडताना मुलांचे स्वप्न महत्त्वाचे की पालकांची अपेक्षा? हा प्रश्न आज अनेक कुटुंबांसमोर उभा आहे. एका बाजूला पालकांची सुरक्षित भविष्याची चिंता, तर दुसऱ्या बाजूला मुलांच्या मनात असलेली वेगळी स्वप्ने! या दोन्हींचा समतोल साधणे ही काळाची गरज आहे. डॉक्टर, अभियंता, सनदी अधिकारी किंवा मोठ्या कंपनीतील अधिकारी व्हावे, अशी अपेक्षा अनेक पालक आपल्या मुलांकडून करतात. या अपेक्षांमागे मुलांचे भविष्य सुरक्षित व्हावे, त्यांना चांगले उत्पन्न मिळावे आणि जीवनात संघर्ष करावा लागू नये, ही प्रामाणिक भावना असते. विशेषतः ग्रामीण भागात शिक्षण आणि नोकरीकडे आर्थिक स्थैर्याचे साधन म्हणून पाहिले जाते. मर्यादित साधनसंपत्ती असूनही पालक मुलांच्या शिक्षणासाठी मोठा खर्च करतात. त्यामुळे मुलांनीही आपल्या कष्टांचे चीज करावे, अशी त्यांची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. मात्र, पालकांनी पाहिलेले स्वप्न आणि मुलांना स्वतःसाठी दिसणारे भविष्य एकच असेल, असे नाही. प्रत्येक विद्यार्थ्याची आवड, क्षमता आणि विचार करण्याची पद्धत वेगळी असते. एखाद्याला विज्ञानाची आवड असते, तर दुसऱ्याला कला, क्रीडा, संगीत, तंत्रज्ञान किंवा उद्योजकतेची ओढ असते. काही विद्यार्थ्यांना संशोधनात रस असतो, तर काहींना स्वतःचा व्यवसाय उभारण्याचे स्वप्न असते. अशा वेळी केवळ समाजातील प्रतिष्ठा किंवा ठरावीक क्षेत्रातील यश पाहून करिअर निवडण्याचा आग्रह धरणे योग्य ठरत नाही. आजही अनेक ठिकाणी विशिष्ट क्षेत्रांनाच अधिक महत्त्व दिले जाते. डॉक्टर किंवा अभियंता होणे म्हणजे यश आणि इतर क्षेत्रांत जाणे म्हणजे कमीपणा, अशी चुकीची समजूत काहींच्या मनात असते. परिणामी, अनेक विद्यार्थी स्वतःची आवड बाजूला ठेवून इतरांच्या अपेक्षांनुसार करिअर निवडतात. पुढे त्या क्षेत्रात रस नसल्यामुळे त्यांना अभ्यास करताना अडचणी येतात. कामात समाधान मिळत नाही आणि अपेक्षित यश न मिळाल्यास निराशाही वाढू शकते. करिअरची निवड केवळ गुणांवर किंवा सामाजिक प्रतिष्ठेवर आधारित नसावी. विद्यार्थ्याची आवड, क्षमता, व्यक्तिमत्त्व, आर्थिक परिस्थिती आणि संबंधित क्षेत्रातील संधी यांचा विचार करणे आवश्यक आहे. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास अनेक पर्यायी क्षेत्रांतही यशस्वी कारकीर्द घडविता येऊ शकते. बदलत्या काळात कौशल्य, कल्पकता, तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता यांनाही मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. पालकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या दबावामुळे विद्यार्थ्यांमध्ये तणाव आणि अपयशाची भीती निर्माण होऊ शकते. परीक्षेतील गुण, प्रवेश परीक्षा आणि स्पर्धात्मक वातावरण यांमुळे आधीच तणावाखाली असलेल्या विद्यार्थ्यांवर घरातील अपेक्षांचे अतिरिक्त ओझे पडते. आपल्याला आवडणारे क्षेत्र निवडले, तर पालक नाराज होतील, अशी भीती काही विद्यार्थ्यांच्या मनात असते. त्यामुळे ते आपल्या भावना व्यक्त करण्याऐवजी मनाविरुद्ध निर्णय घेतात. यशस्वी करिअर म्हणजे केवळ मोठा पगार, उच्च पद किंवा समाजातील प्रतिष्ठा नव्हे. कामातून मिळणारे समाधान, स्वतःची प्रगती, मानसिक स्वास्थ्य आणि आयुष्याकडे सकारात्मकतेने पाहण्याची क्षमता यांनाही तितकेच महत्त्व आहे. ज्या क्षेत्रात व्यक्तीला आवड आहे आणि स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळते, त्या क्षेत्रात ती अधिक उत्साहाने काम करू शकते. यासाठी पालक आणि मुलांमध्ये मोकळा संवाद असणे अत्यंत आवश्यक आहे. मुलांनी आपल्या आवडी, उद्दिष्टे आणि त्यामागील कारणे पालकांना समजावून सांगावीत. पालकांनीही संबंधित क्षेत्रातील संधी, आव्हाने आणि आर्थिक वास्तव यांची माहिती मुलांना द्यावी. केवळ भावनेच्या भरात किंवा मित्रांनी निवडलेले क्षेत्र पाहून निर्णय घेण्याऐवजी योग्य मार्गदर्शन आणि वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे करिअरची निवड व्हायला हवी. शाळा आणि महाविद्यालयांनीही करिअर मार्गदर्शन आणि समुपदेशनावर भर देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना विविध व्यवसायांची ओळख करून देणे, त्यांच्या कौशल्यांचे मूल्यमापन करणे आणि अनुभवी व्यक्तींशी संवाद साधण्याच्या संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांना स्वतःची क्षमता ओळखता येईल आणि योग्य निर्णय घेणे सोपे होईल. मुलांच्या आयुष्याचा मार्ग ठरवताना पालकांनी दिशा दाखवावी; मात्र प्रत्येक निर्णय त्यांच्यासाठी घेऊ नये. त्याचप्रमाणे मुलांनीही स्वातंत्र्याचा अर्थ जबाबदारीपासून दूर जाणे असा समजू नये. आपल्या आवडीच्या क्षेत्रात यश मिळविण्यासाठी मेहनत, शिस्त, सातत्य आणि त्याग करण्याची तयारी ठेवली पाहिजे. शेवटी, मुलांचे स्वप्न आणि पालकांची अपेक्षा यांच्यात संघर्ष निर्माण होण्याऐवजी त्यातून सामायिक ध्येय निर्माण होणे महत्त्वाचे आहे

स्व. अशोकराव मोरे दूध संस्थेच्या चेअरमनपदी बादशहा वाळुंज तर व्हा. चेअरमनपदी अक्षय आहेर



संगमनेर (प्रतिनिधी) : तालुक्यातील अतिशय प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पिंपळगाव कोंझिरा येथील स्व. अशोकराव मोरे दूध उत्पादक संस्था मर्यादितच्या चेअरमनपदी बादशहा वाळुंज तर व्हा. चेअरमनपदी अनिल कर्पे, तर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अक्षय आहेर यांची निवड झाली आहे. या पदाधिकाऱ्यांचे लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सत्कार केला आहे

पिंपळगाव कोंझिरा येथील स्व. अशोकराव मोरे दूध उत्पादक संस्था ही संगमनेर तालुक्यातील अग्रेसर दूध संस्थांपैकी एक म्हणून ओळखली जाते. या संस्थेमार्फत दररोज सुमारे पाच हजार लिटर दूध संकलित केले जाते. संस्थेची सुसज्ज व अद्ययावत इमारत असून, परिसरातील दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही संस्था महत्त्वाची ठरली आहे.

नवनिर्वाचित चेअरमन बादशहा वाळुंज हे संगमनेर तालुका दूध संघाचे संचालक असून, त्यांनी पिंपळगाव कोंझिरा गावचे सरपंच म्हणूनही काम पाहिले आहे. गेल्या तीस वर्षांपासून ते गावच्या नेतृत्वात सक्रिय आहेत. व्हाईस चेअरमन अनिल कर्पे हे उत्कृष्ट दूध उत्पादक शेतकरी म्हणून परिचित आहेत. तर नवनिर्वाचित उपसरपंच अक्षय आहेर हे अभियांत्रिकी पदवीधर आहेत. तिन्ही पदाधिकाऱ्यांच्या निवडीमुळे गावातील सहकार क्षेत्र आणि ग्रामविकासाच्या कामांना नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

कारखान्याच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते व सर्व नवीन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कारप्रसंगी बापूसाहेब कर्पे, बादशहा आहेर, विकास आहेर, राजेंद्र मोरे, सुभाष कर्पे, संदीप कर्पे, संगम आहेर, संतोष कर्पे, प्रथितयश कांदा व्यापारी अशोकशेठ कर्पे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय कर्पे, रोहिदास मोरे, सुनील कर्पे, विजय अडांगळे, मच्छिंद्र खर्डे आदी उपस्थित होते.

या तीनही नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात,आमदार सत्यजितदादा तांबे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, एकविरा फाउंडेशनच्या संस्थापक डॉ. जयश्रीताई थोरात, दूध संघाचे माजी चेअरमन व जिल्हा बँकेचे नवनिर्वाचित संचालक रणजितसिंह देशमुख, कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग घुले, संगमनेर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष अजय फटांगरे आणि माजी जिल्हा परिषद सदस्य रामहरी कातोरे यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

पेटिट विद्यालयात रस्ता सुरक्षा व सायबर गुन्हे जनजागृतीचा प्रभावी संदेश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सर डी. एम. पेटिट हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, संगमनेर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह व सायबर गुन्हे जनजागृती कार्यक्रम बुधवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक शिस्त, कायद्याविषयी आदर आणि डिजिटल सुरक्षिततेची जाणीव निर्माण करणे हा कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीपूजन व दीपप्रज्वलनाने झाली. विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. ए. ब्राह्मणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

विद्यालयाचे कर्तव्यदक्ष व उपक्रमशील पर्यवेक्षक उमेश गुंजाळ सर यांनी विद्यालयातील सर्व शिक्षकांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी त्यांनी दाखविलेली तत्परता, नियोजनकौशल्य व समन्वय उल्लेखनीय ठरला. कार्यक्रमास उपस्थित आदरणीय मान्यवरांचा त्यांच्या पदनामासह परिचय श्री. उमेश गुंजाळ सर यांनी करून दिला.

संगमनेर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विकास ढोकरे यांनी कायद्याचे महत्त्व स्पष्ट करत कष्टाला पर्याय नसल्याचे सांगितले. स्त्रीशक्ती हा समाजाचा भक्कम पाया असून विद्यार्थ्यांनी जबाबदार नागरिक म्हणून घडावे, असे आवाहन त्यांनी केले. पोलीस उपनिरीक्षक श्रीमती विद्या झाडे मॅडम यांनी सायबर गुन्ह्यांपासून बचाव करण्यासाठी ओटीपी, आधार क्रमांक व वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नये, संशयास्पद संदेश आणि लिंकपासून सावध राहावे, असे सांगितले. मुलींनी स्वतःच्या सुरक्षिततेबाबत सजग राहण्याचेही त्यांनी आवाहन केले.

श्रीरामपूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री. सोमनाथ घोलप साहेब व श्री. गोरक्ष कोरडे साहेब यांनी रस्ता हा सार्वजनिक वापरासाठी असून वाहतूक नियमांचे पालन करणे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे अधोरेखित केले. अपघातांमध्ये तरुणांचे होणारे नुकसान चिंताजनक असल्याचे सांगत हेल्मेट, सीटबेल्ट, वेगमर्यादा व वाहतूक संकेतांचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या आयोजनात आर. जे. खाटेकर सर यांनी केलेले सुंदर फलकलेखन, माणिक भडांगे यांचे सहकार्य तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकांचे बहुमोल सहकार्य लाभले. गणेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. अशोक देशमुख ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक देशमुख साहेब यांनी वाहन चालविण्यापूर्वी आवश्यक प्रशिक्षण घेणे, वाहतूक चिन्हे समजून घेणे, वाहनांची नियमित तपासणी करणे आणि सुरक्षित अंतर राखणे यांचे महत्त्व स्पष्ट केले. जबाबदार वाहनचालक होण्यासाठी संयम, सतर्कता व नियमपालन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. उमेश गुंजाळ सर, ज्युनिअर कॉलेजचे प्रभारी श्री. गभाले सर, मान्यवर अधिकारी, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

जय संताजी महिला मंडळाच्या 'कोण होणार नवदुर्गा?'

उपक्रमात प्रभावती कर्पे व छाया नागुलकर विजेत्या



संगमनेर-

संगमनेर येथील जय संताजी महिला मंडळाच्या वतीने नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या 'कोण होणार नवदुर्गा?' या अभिनव उपक्रमात श्रीमती प्रभावती कर्पे आणि सौ. छाया नागुलकर या दोन महिला विजेत्या ठरल्या.

रविवार दि.१८ ऑक्टोबर २०२६ रोजी नेहरू गार्डन, संगमनेर येथे हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विविध खेळ आणि उखाण्यांच्या माध्यमातून महिलांसाठी हा उपक्रम राबविण्यात आला. त्यामध्ये नशिबवान ठरलेल्या दोन्ही विजेत्या महिलांना जय संताजी महिला मंडळाच्या वतीने कांजीवरम पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले.

जय संताजी महिला मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सौ. शारदा गोरक्ष कर्पे यांच्या संकल्पनेतून 'कोण होणार नवदुर्गा?' हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. जय संताजी महिला बचत गटातील सर्व महिला भगिनींना एकत्र आणणे, त्यांच्यासाठी मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करणे आणि त्यांना आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, हा या उपक्रमामागील उद्देश होता.

कार्यक्रमात महिलांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच उखाण्यांच्या माध्यमातून महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमातून दोन भाग्यवान महिलांची निवड करण्यात आली. त्यामध्ये पहिल्या क्रमांकाचा मान श्रीमती प्रभावती कर्पे यांना, तर दुसऱ्या क्रमांकाचा मान सौ. छाया नागुलकर यांना मिळाला. या दोन्ही विजेत्यांना कांजीवरम पैठणी देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात सौ. शारदा कर्पे, सौ. अनुराधा कर्पे, सौ. कांतिका वाकचौरे, सौ. तारकेश्वरी वालझाडे, सौ. तेजश्री पन्हाळे, कु. वैभवी पन्हाळे, सौ. कविता आंबेकर, सौ. योगिता वालझाडे, सौ. प्रभावती कर्पे, सौ. छाया नागुलकर, सौ. स्वाती नागुलकर, सौ. सविता पाबळकर, सौ. राजश्री व्यवहारे, सौ. वैशाली कर्पे, सौ. कल्पना ढगे, सौ. मनीषा कर्पे, सौ. सारिका पाबळकर, सौ. रुपाली पाबळकर आणि सौ. शीतल वाकचौरे यांनी सहभाग घेतला. महिलांच्या एकत्रित सहभागामुळे कार्यक्रमात आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. खेळ, उखाणे आणि स्नेहपूर्ण संवादाच्या माध्यमातून महिलांनी या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला.

महाराष्ट्रात उकाडा वाढणार

मुंबई - राज्यात सध्या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. घाम, अंगाची लाहीलाही आणि वाढत्या तापमानामुळे अनेकांना थंडीची प्रतीक्षा लागली आहे. मात्र, ऑक्टोबर आणि नोव्हेंबरच्या सुरुवातीला उष्ण वातावरण कायम राहण्याची शक्यता हवामानविषयक अंदाजातून व्यक्त करण्यात आली आहे. एल निनोच्या संभाव्य परिणामांमुळे यंदा थंडीचा कालावधी कमी राहू शकतो, असा अंदाज स्कायमेटचे हवामान तज्ज्ञ महेश पलावत यांनी व्यक्त केल्याचे वृत्त आहे.एल निनो या हवामानविषयक घटनेचा जागतिक तापमानावर परिणाम होऊ शकतो. यंदा त्याच्या प्रभावामुळे काही भागांत उष्ण वातावरण राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, थंडी किती काळ राहील आणि तापमानात किती बदल होईल, हे पुढील हवामान परिस्थितीवर अवलंबून असेल.

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
०२४२५- २२५१२९

CHANGE IN NAME
I, Mohammedsadim Imran Parve, declared that I have changed my old name for passport purpose.
Old Name Mohammadsadim Imran Parve
Change to Mohammedsadim Imran Parve
Address. Mominpura, Sangamner, Ahmednagar (MH)Pin- 422605

पाहिजेत
सेल्समन – २
फार्मासिस्ट – १
अनुभावास प्राधान्य
पलोड मेडिकल, संगमनेर नविन नगर रोड, ताजने मळा, सावंत हॉस्पिटल समोर
९९२२२९४००४

पाहिजेत
मे.साईराज सेल्स कॉर्पोरेशन
Exide battery sales & services (Sangamner)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(टॅलीचे ज्ञान आवश्यक)
बॅटरी विषयी माहिती असलेला - 1जागा
संपर्क क्रमांक:
9822312490

पाहिजेत
ध्येय फायनान्स संगमनेर
Branch manager BM-1
Branch devlopment Menegar BDM- 1
Sales devlopment MenegarSDM - 1
Telicaller - 2 M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
9370773504
7768079272

भाड्याने देणे आहे
टॉप टेन इम्पेरिअल (रिलायन्स डिजीटल) मध्ये ग्राउंड फ्लोअरचे दोन शॉप किंवा ऑफिस भाड्याने देणे आहे
- संपर्क -
9730380303
9552690909

२ बीएचके फ्लॅट्स उपलब्ध!
पत्ता
SBI कॉलनीजवळ, जनता नगर, संगमनेर
संपर्क क्रमांक:
9850569862
9834825883

पाहिजेत
अकाऊंटंट - 2 जागा
कॅशिअर - 2 जागा
सेल्समन - १० जागा (पु.)
सेल्समन - १० जागा (म.)
वॉचमन - २ जागा
आकर्षक पगार दिले जाईल
मुळचंद होलसेल मिल डेपो
अकोले रोड, सेलिब्रेश हॉटेल समोर, संगमनेर
7498901766

पाहिजेत
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य)
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ ॲण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266





आईच्या मायेचा घास आता अवघ्या ४० रुपयांत

लायन्सचा ‘सफायर माझी आई अन्नछत्र’ हा सेवाभावी उपक्रम विजयादशमीला सुरू

गिरीश मालपाणी यांची ५ लाखांची देणगी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आईच्या हातच्या जेवणात केवळ चव नसते, तर तिच्या मायेचा, प्रेमाचा आणि वात्सल्याचा अमृतस्पर्श असतो. याच मायेची ऊब आता गरजू, कष्टकरी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनाही अवघ्या ४० रुपयांत अनुभवता येणार आहे. भुकेल्या पोटाला अन्न, थकलेल्या जीवाला आधार आणि माणुसकीला सेवाभावाची नवी दिशा देणाऱ्या ‘सफायर माझी आई अन्नछत्र’ या कायमस्वरूपी प्रकल्पाचा शुभारंभ विजयादशमीच्या मंगलदिनी संगमनेर येथे झाला. लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरने सुरू केलेला हा उपक्रम म्हणजे केवळ अन्नदान नव्हे, तर ‘कोणीही उपाशी राहू नये’ या संवेदनशील विचाराला कृतीत उतरवणारा माणुसकीचा महायज्ञ ठरणार आहे. ४० रूपयांमध्ये दोन भाज्या, वरण, भात, चपाती, लोणचे, चटणी अशी परिपूर्ण थाळी मिळणार आहे.

लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरतर्फे सोमाणी मंगल कार्यालय येथे या प्रकल्पाचे उद्घाटन उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात करण्यात आले. शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष व एशियन योगासनचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, डिस्ट्रीक्ट गव्हर्नर श्रेयस दीक्षित, सेकंड व्हाइस डिस्ट्रीक्ट गव्हर्नर सुनीताजी मालपाणी आणि माहेश्वरी पंच ट्रस्टचे सेक्रेटरी श्रीकांतजी कासट यांच्या हस्ते या सेवाकार्याचा प्रारंभ झाला.

या सोहळ्याला प्रकल्पाचे संकल्पक व लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरचे संस्थापक अध्यक्ष गिरीश मालपाणी, माजी अध्यक्ष श्रीनिवास भंडारी, अध्यक्ष जितेश लोढा, सेक्रेटरी नम्रता अभंग, खजिनदार चंद्रशेखर गाडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि क्लबचे सदस्य उपस्थित होते.

‘सफायर माझी आई अन्नछत्र’ या प्रकल्पाच्या माध्यमातून गिरीश मालपाणी यांनी याच बांधिलकीचे दर्शन घडवले. या प्रकल्पासाठी त्यांनी पाच लाख रुपयांची देणगी सुपूर्द केली. उद्योजक प्रफुल्ल बोगावत यांनी दरमहा ५००० रूपयांची देणगी जाहिर केली आहे. त्याचबरोबर गिरीश मालपाणी, सुनीताजी मालपाणी, उमेश कासट, सागर मणियार, सुमित अट्टल, कल्याण कासट, सुमित मणियार, पवन करवा, अतुल अभंग, राजश्री भंडारी, संगिता पुंड यांनी दरमहा प्रत्येकी १००० रूपये या प्रकल्पासाठी कायमस्वरूपी देण्याचा संकल्प केला. या देणगीदारांनी आपले धनादेश क्लबकडे सुपूर्द करून सेवाकार्याच्या सातत्यासाठी पुढाकार घेतला.

प्रकल्पाची माहिती देताना अध्यक्ष जितेश लोढा यांनी सांगितले की, गरजू नागरिक, कर्मचारी, कष्टकरी आणि विद्यार्थ्यांना अवघ्या ४० रुपयांत जेवण उपलब्ध करून देणे ही अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि समाजोपयोगी संकल्पना आहे. गिरीश मालपाणी यांनी ही संकल्पना केवळ चर्चेपुरती मर्यादित न ठेवता प्रत्यक्षात आणली, याचा आपल्याला अभिमान असल्याचे लोढा यांनी सांगितले.

या प्रकल्पासाठी सोमाणी मंगल कार्यालयाची वास्तू उपलब्ध करून दिल्याबद्दल माहेश्वरी पंच ट्रस्टच्या वतीने श्रीकांत कासट यांनी समाधान व्यक्त केले. पवित्र आणि समाजोपयोगी कार्यासाठी आपल्या संस्थेच्या वास्तूचा उपयोग होत असल्याचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.

सुनीताजी मालपाणी यांनी आपल्या मनोगतातून ‘माझी आई’ या नावामागील भावार्थ उलगडला. आईच्या हातच्या अन्नातील ममता आणि आपुलकी प्रत्येकाला भावनिक आधार देणारी असते, असे सांगत त्यांनी साईबाबांच्या अन्नदान परंपरेची आठवण करून दिली. साईबाबांनी एका हंडीत संपूर्ण गावासाठी अन्न तयार करून त्याचे वाटप केले. त्या परंपरेतून सामूहिकतेचा, समानतेचा आणि सेवाभावाचा संदेश मिळतो. विजयादशमीच्या शुभदिनी लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरने अशाच विचारातून अन्नछत्र सुरू केले, ही अत्यंत प्रेरणादायी बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रकल्पाचे संकल्पक गिरीश मालपाणी यांनी अन्नछत्राच्या आर्थिक बाजूविषयी उपस्थितांना माहिती दिली. अवघ्या ४० रुपयांत जेवण उपलब्ध करून देत असलो, तरी प्रत्यक्ष भोजनव्यवस्थेचा खर्च मोठ्या प्रमाणावर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हा प्रकल्प कायमस्वरूपी सुरू ठेवण्यासाठी दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन मदतीचा हात द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. साईबाबांच्या हंडीमध्ये गावातील प्रत्येक जण आपल्या क्षमतेनुसार अन्न टाकत असे आणि त्या सामूहिक योगदानातून अनेकांची भूक भागत असे. त्याच भावनेतून प्रत्येकाने आपल्या आर्थिक क्षमतेनुसार देणगी द्यावी असे आवाहन त्यांनी केले.

डिस्ट्रीक्ट गव्हर्नर श्रेयस दीक्षित यांनी संगमनेर सॅफ्रॉन क्लबच्या विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक केले. क्लबने एखादा कायमस्वरूपी समाजोपयोगी प्रकल्प हाती घ्यावा, अशी अपेक्षा आपण गिरीश मालपाणी यांच्याकडे व्यक्त केली होती. आपल्या कार्यकाळातच त्यांनी हा प्रकल्प पूर्णत्वास नेला, याचा विशेष आनंद होत असल्याचे त्यांनी सांगितले. केवळ एखादा कार्यक्रम आयोजित करणे आणि एखादे सेवाकार्य सातत्याने चालवणे, यात मोठा फरक असतो. कायमस्वरूपी प्रकल्पासाठी नियोजन, आर्थिक पाठबळ, समर्पित कार्यकर्ते आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची आवश्यकता असते. ‘सफायर माझी आई अन्नछत्र’ या प्रकल्पाच्या माध्यमातून क्लबने ही जबाबदारी स्वीकारली आहे. भविष्यातही संगमनेर सॅफ्रॉन सफायरने अशा अनेक कायमस्वरूपी प्रकल्पांची उभारणी करावी, अशा शुभेच्छा दीक्षित यांनी दिल्या.

प्रकल्पाचे उद्घाटक डॉ. संजय मालपाणी यांनी आपल्या मनोगतातून अन्नदानाचे आध्यात्मिक आणि सामाजिक महत्त्व विशद केले. ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ आणि अतिथियज्ञ यांप्रमाणेच वैश्वयज्ञ म्हणजे समस्त जीवसृष्टीला अन्न-पाणी देण्याचा यज्ञ होय, असे त्यांनी सांगितले. लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरने अशा यज्ञाचा प्रारंभ केला, ही अभिमानाची बाब असल्याचे नमूद करत त्यांनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. गरजू नागरिकांना ४० रुपयांत जेवण देण्याबरोबरच भविष्यात गरजू शाळांच्या मध्यान्ह भोजनाची जबाबदारीही क्लबने स्वीकारावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे या सेवाकार्याचा विस्तार होऊन अधिकाधिक विद्यार्थ्यांना लाभ मिळू शकेल, असे त्यांनी सुचवले. माजी अध्यक्ष श्रीनिवास भंडारी यांनी या प्रकल्पाच्या उभारणीत उमेश कासट, कल्याण कासट, राजेश मालपाणी, अतुल अभंग आणि रोहित मणियार यांनी विशेष मेहनत घेतल्याचे सांगितले. कोणत्याही मोठ्या उपक्रमामागे अनेकांचे परिश्रम, वेळ आणि समर्पण असते. या सर्वांच्या सहभागातूनच प्रकल्पाला प्रत्यक्ष स्वरूप मिळाल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीनिवास भंडारी यांनी केले, तर अतुल अभंग यांनी आभार मानले. या सोहळ्याला क्लबचे सर्व सदस्य उपस्थित होते.

‘सफायर माझी आई अन्नछत्र’ची चूल अखंड पेटती राहो, तिच्या प्रत्येक घासातून मायेचा सुगंध दरवळत राहो आणि समाजातील प्रत्येक दानशूर हात या सेवायज्ञात सहभागी होवो, हीच या मंगल प्रारंभानिमित्त सदिच्छा!

सेवाकार्यासाठी मालपाणी उद्योग समूहाची भक्कम साथ - डॉ. संजय मालपाणी

‘अन्नदान हे श्रेष्ठदान आहे. ‘सफायर माझी आई अन्नछत्र’ची चूल अखंड पेटती राहण्यासाठी केव्हाही मालपाणी उद्योग समूहाची मदत लागली तर आम्ही भक्कमपणे तुमच्या पाठीशी आहोत अशी ग्वाही डॉ. संजय मालपाणी यांनी यावेळी दिली. गिरीश मालपाणी यांनी वैयक्तिक खात्यातून पाच लाख रुपयांची देणगी दिल्याबद्दल त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला. तसेच क्लबच्या काही सदस्यांनी दरमहा एक हजार रुपये तर उद्योजक प्रफुल्ल बोगावत यांनी दरमहा पाच हजार रुपये देण्याचा संकल्प केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे कौतुक केले. अन्नदानाच्या कार्यातून गरजूंची भूक भागवण्याबरोबरच देणगीदारांच्या जीवनातही समृद्धी आणि भरभराट येते अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

संगमनेरला विजयादशमीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शिस्तबद्ध पथसंचलन

आ. अमोल खताळ यांचा स्वयंसेवक म्हणून सहभाग



संगमनेर : प्रतिनिधी

विजयादशमी निमित्त शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने शिस्तबद्ध पथसंचलन करण्यात आले. या पथ संचलनामध्ये संगमनेरचे आमदार अमोल खताळ पाटील यांनी स्वतः स्वयंसेवक म्हणून सहभागी होत संघाच्या कार्यकर्त्यांसोबत संपूर्ण शहरातून पायी चालत पथसंचलन केले . पारंपरिक गणवेशातील स्वयंसेवकांचे शिस्तबद्ध संचलन, एकसमान पावले आणि संघभावनेचे दर्शन यामुळे शहरातील वातावरण उत्साहपूर्ण झाले होते. विविध भागांत नागरिकांनी स्वयंसेवकांवर पुष्पवृष्टी करून पथसंचलनाचे स्वागत केले.

संगमनेर शहरातील अकोले नाका शारदा विद्यालयाच्या प्रांगणामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक एकत्र जमले. यानंतर शिस्तबद्ध पद्धतीने पथसंचलनाला सुरुवात झाली. या पथसंचलनामध्ये आमदार अमोल खताळ पाटील यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघचालक सुभाष कोथिंबीर, सोपानराव देशमुख आणि संघाचे अनेक पदाधिकारी व स्वयंसेवक सहभागी झाले होते. अकोले नाका येथून सुरू झालेले हे पथसंचलन नगरपालिका परिसर, लालबहादूर शास्त्री चौक, रंगार गल्ली, चंद्रशेखर चौक, देवी गल्ली, मेन रोड, माळीवाडा, नेहरू गार्डन, बी.एड. कॉलेज आणि अकोले बायपास रोड या मार्गाने पुढे गेले. शहरातील प्रमुख चौक आणि रस्त्यांवरून मार्गक्रमण करताना स्वयंसेवकांचे ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. नागरिकांनी या पथसंचलनाला प्रतिसाद दिला.

विजयादशमी सन हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दृष्टीने महत्त्वाचा उत्सव मानला जातो. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या पथ संचलनालातून शिस्त, एकजूट, संघ भावना व सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. या पथसंचलनाची मातोश्री मंगल कार्यालय येथे सांगता झाली. आ. अमोल खताळ यांच्या सहभागामुळे या पथसंचलनाला विशेष लक्ष वेधले गेले.

साकूर-मांडवे केटिवेअरवरील उपसा सिंचनाचे वीज कनेक्शन बंद होणार! जलसंपदा विभागाचा निर्णय

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- एल-निनोच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पाणीटंचाईचा धोका लक्षात घेऊन उपलब्ध जलसाठ्याचे काटकसरीने नियोजन करण्यासाठी जलसंपदा विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. संगमनेर तालुक्यातील साकूर आणि मांडवे येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांमधून अधिकृत पिण्याच्या पाण्याच्या वापराव्यतिरिक्त सुरू असलेल्या सर्व उपसा सिंचन योजनांचे वीज कनेक्शन तातडीने पूर्णपणे बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी बुधवारपासून करण्यात येणार असल्याची माहिती साकूर महावितरणचे सहायक अभियंता राजेशकुमार झा यांनी दिली. या निर्णयामुळे परिसरातील शेतीच्या सिंचनाचा प्रश्न ऐरणीवर येण्याची शक्यता आहे.

संगमनेर पाटबंधारे उपविभागाचे सहाय्यक अभियंता (श्रेणी-१) यांनी १६ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संगमनेर उपविभागाच्या उपअभियंत्यांना पत्र पाठवून यासंदर्भात कार्यवाही करण्याची सूचना केली आहे. साकूर येथील वीज वितरण शाखेच्या शाखाधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश देऊन संबंधित उपसा सिंचन योजनांचे वीज कनेक्शन बंद करण्याबाबत कार्यवाही करण्यास सांगण्यात आले आहे.

जलसंपदा विभागाच्या ५ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयाचा आणि गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या ६ ऑक्टोबर रोजीच्या पत्राचा संदर्भ या आदेशात देण्यात आला आहे. एल-निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत काटकसरीने, प्राधान्यक्रमाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संभाव्य पाणीटंचाईच्या परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुरक्षित ठेवणे हा या नियोजनाचा प्रमुख उद्देश आहे. या निर्देशांनुसार साकूर आणि मांडवे बंधाऱ्यांमधून अधिकृत पिण्याच्या पाण्याच्या वापराव्यतिरिक्त सुरू असलेल्या सर्व उपसा सिंचन योजनांचे वीज कनेक्शन बंद करण्यासाठी संबंधित यंत्रणांना कार्यवाही करण्यास सांगण्यात आले आहे.

या आदेशाच्या अनुषंगाने महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांसह संगमनेरचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि संबंधित सिंचन शाखेला पत्राच्या प्रती पाठविण्यात आल्या आहेत. त्यामुळे आदेशाच्या अंमलबजावणीसाठी विविध प्रशासकीय यंत्रणांना अवगत करण्यात आले आहे. साकूर आणि मांडवे परिसरातील बंधाऱ्यांवर अवलंबून असलेल्या उपसा सिंचन योजनांचे वीज कनेक्शन बंद झाल्यास संबंधित योजनांमधून होणाऱ्या पाणीउपशावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या योजनांवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसमोर सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून घेण्याचे आव्हान निर्माण होण्याची शक्यता आहे.

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचा साठा सुरक्षित ठेवण्याला प्राधान्य दिले जात आहे, तर दुसरीकडे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता हा शेतकऱ्यांसाठी जिव्हाळ्याचा विषय आहे. अशा परिस्थितीत पिण्याच्या पाण्याचे संरक्षण करताना शेतीच्या सिंचनावर होणाऱ्या परिणामांचे व्यवस्थापन कसे केले जाणार, याकडे साकूर-मांडवे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दसऱ्यानिमित्त दंडे गोल्ड अँड डायमंड्समध्ये ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - सन १९२७ पासून सराफी व्यवसायात कार्यरत असलेल्या दंडे गोल्ड अँड डायमंड्सने आपल्या दर्जेदार दागिन्यांची परंपरा, विश्वासार्ह सेवा आणि कलात्मकतेच्या जोरावर ग्राहकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. अनेक वर्षांचा अनुभव, पारंपरिक कारागिरी आणि आधुनिक डिझाइन्सचा सुंदर संगम साधणारी दंडे ही नाशिकमधील एक प्रतिष्ठित सराफी पेढी आहे. ग्राहकांचा विश्वास जपत सोन्या-चांदीच्या तसेच हिऱ्यांच्या दागिन्यांमध्ये विविध प्रकार आणि आकर्षक डिझाइन्स उपलब्ध करून देणे हे दंडे गोल्ड अँड डायमंड्सचे वैशिष्ट्य आहे.

दसरा आणि दिवाळी या सणांच्या पार्श्वभूमीवर दंडे गोल्ड अँड डायमंड्सच्या नाशिक रोड, सिन्नर आणि संगमनेर येथील शाखांमध्ये ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळत आहे. सणासुदीच्या काळात सोने खरेदीला विशेष महत्त्व असते. नवीन दागिने खरेदी करणे, कुटुंबीयांना भेटवस्तू देणे तसेच शुभमुहूर्तावर सोन्याची खरेदी करणे यासाठी ग्राहकांकडून सराफी पेढ्यांना पसंती दिली जात आहे. याच पार्श्वभूमीवर दंडे गोल्ड अँड डायमंड्समध्ये विविध प्रकारच्या सोन्याच्या आणि हिऱ्यांच्या दागिन्यांची खरेदी करण्यासाठी ग्राहकांची वर्दळ वाढत आहे.

ग्राहकांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन पारंपरिक दागिन्यांपासून ते आधुनिक डिझाइन्सपर्यंत विविध पर्याय उपलब्ध असल्याने ग्राहकांना त्यांच्या पसंतीनुसार दागिन्यांची निवड करता येत आहे. सणासुदीच्या खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना दर्जेदार दागिने, आकर्षक डिझाइन्स आणि विशेष सवलतींचा लाभ घेता येत असल्याने या उत्सवाच्या काळात खरेदीला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

दसरा व दिवाळीनिमित्त दंडे गोल्ड अँड डायमंड्सतर्फे ११ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत विशेष सणासुदीची ऑफर सुरू करण्यात आली आहे. या ऑफरअंतर्गत सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर ५०% पर्यंत सूट आणि हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजुरीवर १००% पर्यंत सूट अशा आकर्षक सवलती ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत.

दसरा आणि दिवाळीच्या शुभमुहूर्तावर दागिने खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी ही ऑफर विशेष आकर्षण ठरत आहे. सोन्याच्या आणि हिऱ्यांच्या दागिन्यांची खरेदी करताना आकर्षक सवलतींचा लाभ घेण्याची संधी मिळत असल्याने ग्राहकांकडून या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. दर्जा, विश्वास आणि कलेचा वारसा जपत दंडे गोल्ड अँड डायमंड्सने ग्राहकांशी असलेले नाते अधिक दृढ करण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हीच या विश्वासार्ह परंपरेची पावती असून, यंदाच्या दसरा-दिवाळी सणानिमित्तही दंडे गोल्ड अँड डायमंड्समध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

अधर्म वाढल्यावर भगवंत अवतार घेवून सृष्टीला तारतो - जाधव महाराज

पाचेगाव फाटा - अधर्माचा नाश करण्यासाठी भगवंताने अनेक रूप घेऊन सृष्टीला तारले असे प्रतिपादन संदीप महाराज जाधव यांनी केले. पाचेगाव येथील नवरात्र उत्सव सांगता प्रसंगी काल्याच्या किर्तनात ते बोलत होते. ते म्हणाले, पृथ्वीतलावर ज्या ज्या वेळेस अधर्म वाढले त्या त्या वेळेस अनेक रुपात भगवंताने या सृष्टीत अवतार घेऊन अधर्माचा नाश केला. शास्त्र सांगते त्याप्रमाणे प्रथम भगवंत, दुसरे साधुसंत आणि तिसरे आपण मनुष्याचे जीवन असल्याचे सांगितले. नवरात्रौत्सव काळात अखंड पारायण संकिर्तन महोत्सवाचे हे ५२ वे वर्ष होते. या काळात सकाळी ५ ते ६ काकडा भजन विष्णू सहस्रनाम, सकाळी ६ ते ९ ज्ञानेश्वरी ज्ञानेश्वरी पारायण ५ ते ६ हरिपाठ व रात्री ८ ते १० या काळात अनेक महाराजांचे हरिकिर्तन सोहळा झाला. महंत भास्करगिरी महाराजांनी उपदेश केल्याप्रमाणे पुढील वर्षी अन्नदानाची सेवा सुरू सुरू करणार असल्यांचे यावेळी सांगण्यात आले.

कीर्तन झाल्यानंतर भाविकांनाः गावातील स्व. अंबादास मोहन मतकर यांच्या स्मरणार्थ मतकर कीर्तनाला परिवार यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला. पाचेगाव, गोणेगाव, इमामपूर पुनतगाव येथील भाविक उपस्थित होते.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

वाईटावर मिळवलेला विजय म्हणजे रावण दहन : मनीष मालपाणी

हजारों संगमनेरकरांचा एकाचवेळी जयघोष; सात हजारांहून अधिक झाडांचेही वाटप



सामाजिक कार्यकर्त्या तथा नगरसेविका रचना मालपाणी यांच्या संकल्पनेतून गेल्या दशकभरापासून विजयदशमी सोहळ्यासाठी मालपाणी पार्कच्या परिसरात येणार्या नागरिकांना फुला-फळांच्या झाडांचे मोफत वितरण करुन वृक्षसंवर्धनाचा संदेशही दिला जातो. विशेष म्हणजे त्यासाठी लागणारी रोपंही मालपाणी फार्ममध्येच तयार केली जातात. याशिवाय वर्षभरात मालपाणी परिवारातील विविध सदस्यांच्या वाढदिवसांच्या निमित्ताने होणार्या वृक्षारोपण सोहळ्यांसाठी लागणारी हजारों झाडेही याच ठिकाणी तयार करुन नियोजनानुसार त्याचे रोपण केले जाते. यंदाच्या सीमोल्लंघन सोहळ्यात सहभागी झालेल्या जवळपास सात हजार नागरिकांना गुलाब, मोगरा या फुलझाडांसह पेरु आणि आवळ्याची रोपं वाटण्यात आली.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - चांगल्याचा स्वीकार आणि वाईटाचा त्याग याचाच अर्थ रावण दहन असे प्रतिपादन मालपाणी उद्योग समूहाचे संचालक, वृक्षमित्र मनीष मालपाणी यांनी केले. सालाबादप्रमाणे विजयादशमीनिमित्त मालपाणी इंडस्ट्रियल पार्कमध्ये ३६ फुट रावणाच्या प्रतिमेचे दहन करण्यात आले. यावेळी शहरासह आसपासच्या गावांमधील हजारों नागरिकांची उपस्थिती होती. रावण दहनापूर्वी उपस्थितांना शुभेच्छा देताना ते बोलत होते.

विजयादशमीच्या दिनी सीमोल्लंघन करुन मालपाणी उद्योग समूहाच्या प्रांगणातील शमी वृक्षाचे पूजन करण्याची शतकीय परंपरा आहे. त्या निमित्ताने उद्योग समूहाच्यावतीने संपूर्ण परिसरात आकर्षक रोषणाईसह केली जाते. कारखान्याच्या विस्तीर्ण अंतर्गत भागात विविध ऐतिहासिक व पौराणिक देखाव्यांची उभारणी आणि सजावट यामुळे हा परिसर म्हणजे प्रत्यक्ष इंद्रलोकाची सफर घडवणाराच भासतो. या उत्सवाची सुरुवात रावणाच्या प्रतिकेचे दहन करुन केली जाते. सायंकाळी साडेसात वाजता पार पडलेल्या या दिमाखदार सोळ्याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून कलश बियाणे, समीर अग्रवाल आणि त्यांच्या पत्नी वषार् यांच्यासह मालपाणी परिवारातील ज्येष्ठ सदस्या ललिता व सुवर्णा मालपाणी, उद्योग समूहाचे चेअरमन राजेश डॉ. संजय, मनीष, गिरीश, आशिष, जय, यश, हर्ष मालपाणी यांच्यासह मालपाणी परिवारातील सदस्य उपस्थित होते.

यावेळी बोलताना मनीष मालपाणी पुढे म्हणाले की, अनेक दशकांपासून संगमनेरकरांच्या सहकार्यामुळे आणि प्रचंड उत्साहामुळे व अखंडित प्रतिसादामुळे मालपाणी इंडस्ट्रियल पार्कमध्ये होणारा सीमोल्लंघन, शमीपूजन सोहळा आणि रावण दहन राज्यात सर्वत्र पोहोचला आहे. खरेतर मालपाणी परिवाराचे हे सौभाग्य आहे की मालपाणी इंडस्ट्रियल पार्कच्या आवारात हजारो संगमनेरकर सहकुटुंब येतात आणि शमीवृक्षाचे पूजन करतात.

डॉ. संजय मालपाणी यांनी दशहरा आणि विजयादशमी या शब्दांचे अर्थ सहज रीतीने उलगडून दाखवले. विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या उद्योजक अग्रवाल दाम्पत्याच्या हस्ते श्रीराम प्रतिमेच्या हाती असलेल्या बाणाची वात पेटवून ३६ फुटी उंचीच्या आकर्षक पद्धतीने सजवलेल्या आणि रंगबिरंगी फाटक्यांनी भरलेल्या रावणाच्या प्रतिमेला अग्नि दिला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पारंपरिक कार्यक्रम सादर करण्यात आले. चित्रपटात गाजलेल्या तात्या विंचूसह गोरीला डान्स, हनुमान डान्स आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील रोमांचकारी प्रसंग उभे करणाऱ्या समूह नृत्याने या सोहळ्यात रंग भरले. ध्रुव ग्लोबल स्कूलच्या तृप्ती डोंगरे या विद्यार्थीनीने सादर केलेल्या दुर्गा तांडव स्तोत्राने उपस्थित भारावले होते. तर, शाळेच्या दहा योगासनपटूंनी सादर केलेल्या थरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची वाहवा मिळवली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन मुरारी देशपांडे यांनी केले. या सोहळ्यासाठी व्यवस्थापक रमेश घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यसमित्या कार्यान्वित होत्या. शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक समीर बारावकर आणि त्यांच्या सहकार्यांनी या प्रचंड गर्दीच्या उत्सवाचे योग्य नियोजन केल्याबद्दल संगमनेरकरांच्यावतीने त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

पारेगाव बुद्रुकमध्ये बिबट्या मृतावस्थेत आढळला



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- : संगमनेर तालुक्यातील पारेगाव बुद्रुक हद्दीत काकडवाडी-पारेगाव रस्त्यालगत असलेल्या चाप्याच्या मळा येथे बुधवारी (दि. २१ ऑक्टोबर) सकाळी आठ वाजेच्या सुमारास साधारण एक ते दीड वर्षे वयाची मादी बिबट्या मृतावस्थेत आढळून आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, बिबट्याचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

पारेगाव बुद्रुक हद्दीतील चाप्याच्या मळा परिसरात रस्त्यालगत बिबट्या मृतावस्थेत आढळल्याचे समजताच नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मृत बिबट्या मादी असून, तिचे वय साधारण एक ते दीड वर्षे असल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, या बिबट्याचा मृत्यू वाहनाच्या धडकेमुळे झाला असावा, अशी शक्यता व्यक्त केली जात असली, तरी मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाने तपास सुरू केला आहे. वनरक्षक एस. बी. सोनवणे यांनी ही माहिती दिली. वनविभागाच्या तपासानंतरच बिबट्याच्या मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागात बिबट्यांचा वावर असल्याने वन्यजीवांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. वन्यप्राण्यांचा अधिवास सुरक्षित ठेवणे, रस्त्यांवरून प्रवास करताना सतर्कता बाळगणे आणि वन्यजीवांच्या संरक्षणाबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. दरम्यान, मृत वन्यप्राणी आढळल्यास नागरिकांनी त्याला हात लावू नये किंवा घटनास्थळी गर्दी करू नये. तातडीने वनविभागाला माहिती देऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करू द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. पारेगाव बुद्रुक येथील या घटनेत मादी बिबट्याचा मृत्यू कशामुळे झाला, हे वनविभागाच्या तपासातून स्पष्ट होणार असून, त्याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

अॅड. अमित धुळगंड यांचे निधन

अंकाई गडावर दर्शनासाठी जातांना हृदयविकाराचा झटका

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील मांडवे बुद्रुक येथून एक दुःखद बातमी समोर आली आहे. भारतीय जनता पक्षाच्या कायदा सेलचे जिल्हा संयोजक अॅड. अमित धुळगंड यांचे बुधवारी (दि. २१ ऑक्टोबर) सकाळी साडे आठच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. नाशिक जिल्ह्यातील मनमाड जवळ असलेल्या ऐतिहासिक अंकाई गडावर दर्शनासाठी गेले असताना ही दुर्दैवी घटना घडली. त्यांच्या निधनामुळे मांडवे बुद्रुकसह संगमनेर तालुक्यात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अॅड. धुळगंड हे बुधवारी पहाटे



अंकाई गडावर दर्शनासाठी गेले होते. गड चढून वर गेल्यानंतर त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला. या घटनेत त्यांचे निधन झाले.

अॅड. अमित धुळगंड हे गेल्या अनेक वर्षांपासून वकिली व्यवसायात कार्यरत होते. भारतीय जनता पक्षाच्या कायदा सेलचे जिल्हा संयोजक म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत होते. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांचे एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून त्यांची राजकीय वर्तुळात ओळख होती. विधी क्षेत्रातील कामासोबतच त्यांना सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात विशेष रुची होती. विविध क्षेत्रांतील त्यांच्या सक्रिय सहभागामुळे त्यांचा अनेकांशी संपर्क होता. त्यांच्या आकस्मिक निधनाच्या वृत्ताने मित्रपरिवार, राजकीय सहकारी आणि परिचितांमधून हळहळ व्यक्त होत आहे. अॅड. अमित धुळगंड यांच्या निधनाने मांडवे बुद्रुक परिसराने एक सक्रिय विधिज्ञ आणि राजकीय कार्यकर्ता गमावला आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

मुळचंद
आता आपल्या संगमनेरमध्ये
होलसेल मिल डेपो
डायरेक्ट मिल ते ग्राहक
लेडीज विअर
साडी सेक्शन
यंदाची दिवाळी मुळचंदसोबतच
मो. 7498901766
हॉटेल सेलिब्रेशन समोर, अकोले रोड, संगमनेर

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
हेल्थ इंडिया इन्शुरन्स
FHPL हेल्थ इन्शुरन्स
इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
बजाज आलियांज इन्शुरन्स
एसबीआय जनरल इन्शुरन्स
ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
मेडसेव टीपीए प्रा.लि.
जेनिन्स इंडिया टीपीए लि.
ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
टाटा एआयजी इन्शुरन्स
रिलायन्स जनरल इन्शुरन्स
मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
नॅशनल इन्शुरन्स कं.
न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
युनायटेड हेल्थकेअर लि.
Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
एम.डी.इंडिया हेल्थकेअर
विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग
अतिदक्षता विभाग
अपघात विभाग
डायलिसीस विभाग
सुपर स्पेशालिटी विभाग
न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग
मेडिसीन विभाग
अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट
स्पाईन सर्जरी
मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist

डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25